महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६५ वा | दिनांक : १८/०८/२०२५ | वार : सोमवार

## नाशिकच्या पालकमंत्रिपदावर गिरीश महाजनांचा दावा



**नाशिक :** महायुतीमध्ये सुरू असलेला नाशिकच्या पालकमंत्री पदाचा वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. भाजपचे नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी धुळ्यातील एका कार्यक्रमात थेट "नाशिकचा पालकमंत्री मीच होणार," असे ठामपणे सांगून राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. तर गिरीश महाजन यांच्या या दाव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनीही नाशिकच्या पालकमंत्री पदावर आपल्या पक्षाचा हक्क असल्याचे म्हटले आहे. दोघांच्या विधानामुळे महायुती सरकारमधील धुसफूस पुन्हा चव्हाट्यावर आली आहे.

महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी गिरीश महाजन यांच्यावर सोपवली होती. मात्र, स्थानिक नेत्यांच्या तीव्र विरोधामुळे अवघ्या एका दिवसात ही नियुक्ती रद्द करण्यात आली. तरीही, धुळ्यातील दहीहंडी उत्सवाच्या कार्यक्रमात महाजन यांनी पुन्हा एकदा "नाशिकचा पालकमंत्री मीच होणार" असे सणसणीत विधान करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवली. "मी दरवर्षी नाशिकला जातो आणि आता तिथे पालकमंत्री म्हणून काम करणार," असे महाजन म्हणाले.

गिरीश महान यांनी धुळ्यातील एका दहीहंडी कार्यक्रमात उपस्थिती लावली होती. यावेळी त्यांनी तरुणांना संबोधित करताना नाशिकच्या पालकमंत्री पदाचा दावा ठोकला. पाऊस सुरू असतानाही दहीहंडीचा उत्साह कायम आहे. मी दरवर्षी धुळ्यात येतो आणि नाशिकलाही जातो. आता नाशिकचा पालकमंत्री म्हणून काम करणार, असे त्यांनी जाहीरपणे सांगितले.

गिरीश महाजन यांच्या दाव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधताना नाशिकच्या पालकमंत्रिपदासाठी आपली भूमिका स्पष्ट केली. रायगडमध्ये आमची एकच जागा आहे. पण त्यासाठी आम्ही पालक मंत्रिपदाचा आग्रह धरतो. त्याप्रमाणे नाशिकचे सर्वाधिक 7 आमदार आहेत. त्यासाठी त्यांनीही पालकमंत्रिपदासाठी तितकाच आग्रह धरावा. पालकमंत्री कोण होणार हा प्रश्न नाही. पण जर एकाच पक्षाचे सात आमदार असतील, तर त्या पक्षाला पालक मंत्रिपद मिळाले पाहिजे, याबद्दल मी अजित पवार आणि सुनील तटकरे यांच्याशी बोलेन. सात आमदारांचा दम आहे, शक्ती लावू, असे छगन भुजबळ म्हणाले.

दरम्यान, छगन भुजबळ यांच्या मागणीवर प्रतिक्रिया देताना मंत्री गिरीश महाजन यांनी आपल्या धुळ्यातील विधानावरून यु-टर्न घेतला. मी पालकमंत्री होतोय असे मी कुठेही बोललेलो नाही. पालकमंत्री पदासंदर्भात आमचे नेते, वरिष्ठ आणि मुख्यमंत्री निर्णय घेतील. मी कोणताही दावा करणार नाही आणि मुख्यमंत्री जो निर्णय घेतील तो मला मान्य असेल, असे गिरीश महाजन म्हणाले.

लोक मला पालकमंत्री बोलत होते. मी त्यांना बोललो पालकमंत्री अजून होणार आहे. पालकमंत्री म्हणून मी माझे बोर्डही लावलेले नाही. तसेच ज्यांनी हे बोर्ड लावले होते त्यांना काढायला लावले. झेंडावंदनाचा तात्पुरता मला अधिकार दिला आहे. झेंडावंदन केले म्हणून पालकमंत्री झालो असे नाही. छगन भुजबळ ज्येष्ठ आहेत मी 95 ला आलो ते 90 पासून राजकारणात आहेत. नाशिकच्या पालकमंत्री पदावर निर्णय व्हायला उशीर होतोय परंतु आता जो निर्णय होईल तो आम्हाला मान्य राहील. परंतु माझी पालकमंत्री पदासंदर्भात वैयक्तिक, रस्सीखेच आग्रही भूमिका नाही, असेही गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले.

## शालार्थ आयडी घोटाळ्याचा मुख्य आरोपी अटकेत




**नागपूर :** राज्यभरात गाजत असलेल्या नागपूर जिल्ह्यातील शालार्थ आयडी घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार नीलेश वाघमारे याला अखेर चार महिन्यांनंतर अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. वाघमारेच्या अटके नंतर शालार्थ आयडी घोटाळ्यातील वस्तुस्थिती उघड होणार आहे. त्याच्या अटकेमुळे अनेकांचे धाबे दणाणले आहे. वाघमारेला १९ पर्यत पीसीआर देण्यात आला आहे.

पोलिसांनी वाघमारेच्या वासुदेव नगर येथील घराची झडती घेऊन त्याचा मोबाईल व लॅपटॉप जप्त केला आहे. यातून अनेक महत्वाचे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने घोटाळा केल्याचे वाघमारेचे म्हणने आहे. त्यामुळे या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी सायबर पोलिसांच्या रडारवर येण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली. बँक खाती गोठवण्यासह पोलिसांनी चारही बाजूंनी कोंडी केल्यामुळे वाघमारेसमोर अटकेशिवाय पर्यायच राहिला नव्हता असे सूत्रांनी सांगितले. वाघमारेने सुमारे १२५ बोगस शालार्थ आयडी तयार करून पगार काढल्याचे सूत्रांनी सांगितले.

शिक्षक भरती घोटाळा प्रकरणातील प्रमुख आरोपी, वेतन अधीक्षक निलेश वाघमारे चार महिन्यांपासून फरार होता. खबऱ्यांनी दिलेल्या टिपनुसार सायबर क्राईम आणि एसआयटीच्या टिपने त्याचा दिल्ली, मुंबई, गोवा आणि हैद्राबाद येथे टिम पाठवून शोध घेतला. परंतु एकाही ठिकाणी वाघमारे आढळला नव्हता. चार महिन्यांपासून वाघमारे पोलिसांना सतत हुलकावणी देत होता.या प्रकरणी वाघमारेच्या पत्नीसह त्याच्या कुटुंबीयांचीही चौकशी करण्यात आली होती. वाघमारेची पत्नी मेघा नायब तहसिलदार आहे. त्यांचीही चौकशी करण्यात आली. मात्र, वाघमारेचा काहीच ठावठिकाणा माहिती नसल्याचे सांगत आल्या.

जिल्हा व सत्र न्यायालयाने वाघमारेचा अटक पूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. उच्च न्यायालयानेही त्याचा अंतरिम अटकपूर्व जामीन फेटाळत दिलासा देण्यास नकार दिला होता.राज्यभरात गाजत असलेल्या नागपूर जिल्ह्यातील शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास करणाऱ्या सायबर पोलिसांनी ३० जुलै रोजी नागपूर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर श्रीराम काळुसे (वय ५०) व रोहिणी विठोबा कुंभार (वय ४९) यांना अटक केली होती. हे दोघेही सध्या जामीनावर बाहेर आहेत. तर संभाजी नगर शिक्षण मंडळाच्या सचिव व नागपूर विभागाच्या माजी शिक्षण उपसंचालक वैशाली जामदार यांना अटकेची पूर्व कल्पना देण्यात आली नाही, या तांत्रिक कारणास्तव जामीन देण्यात आला आहे.

## सरन्यायाधीश भूषण गवईंच्या हस्ते कोल्हापूर सर्किट बेंचचे उद्घाटन



**कोल्हापूर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच इमारतीचे उद्घाटन आज भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते फित कापून व कोनशिलेचे अनावरण करुन करण्यात आले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, व मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक आराधे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्किट बेंच इमारतीच्या उद्घाटनाचा भव्य सोहळा पार पडला.

प्रमुख पाहुणे म्हणून सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार शाहू महाराज छत्रपती, खासदार धैर्यशील माने उपस्थित होते. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती चंद्रशेखर, सर्किट बेंचसाठी नियुक्त केलेले न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, न्यायमूर्ती शिवकुमार दिगे, न्यायमूर्ती शर्मिला देशमुख, न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर, तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डांगरे, कोल्हापूर जिल्हा पालक न्यायमूर्ती मनीष पितळे, न्यायमूर्ती अनिल किलोर तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, आमदार चंद्रदीप नरके, आमदार शिवाजी पाटील, ज्येष्ठ संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव, जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्त के.मंजूलक्ष्मी, विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे पुणे विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# पर्यटकांची फुल गर्दी वेरूळ लेणी सह वेरूळ दौलताबाद घाटात वाहतूक ठप्प



**खुलताबाद : (प्रा. योगेश रावते) :** शुक्रवार स्वातंत्र्य दिन ,शनिवार व रविवार असे सलग तीन दिवस सुट्ट्या असल्यामुळे खुलताबादच्या भद्रा मारुती मंदिरात दर्शनासाठी व वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर महादेव मंदिर तसेच जगप्रसिद्ध लेणी येथे भाविकांची व पर्यटकांची मोठी गर्दी उसळल्याने दिवसभर परिसरात वाहतुकीची कोंडी झाली होती. शुक्रवारी सकाळीच वेरूळ लेणीचा परिसर पर्यटकांच्या गर्दीने फुलून गेला होता वाहन तळ पूर्ण भरल्याने अनेकांनी रस्त्याच्या कडेला जिथे जागा मिळेल तिथे वाहने पार्क केली होती. सकाळपासूनच घृष्णेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या शनिवारी थेट वेरूळ गावात कन्नड चौका पर्यंत रांगा लागल्या होत्या दर्शनासाठी भाविकांना जवळपास दोन ते तीन तास लागत होते.तर वाहनांच्या रांगा धुळे सोलापूर बायपास महामार्गावरील उड्डाणपूल जवळील विश्वकर्मा कॉलनी पर्यंत वाहतूक ठप्प होती त्यात दिवसभर पावसाच्या सरी कोसळत होत्या. वेरूळ दौलताबाद घाटात शनिवारी वाहतुकीची कोंडी होत असल्याचे नेहमीच पाहायला मिळते तरीही श्रावण मास, भाविक व पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासन यावर काहीही उपाय काढत नसल्याचे पुन्हा दिसून आले. त्याचा मानसिक त्रास भाविकांसह वाहनधारक पर्यटकांना सहन करावा लागतो.

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस
DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स
PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास
PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics
रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास
9405109103 | 8830838903

# असा आमचा पोळा होता



आज पोळ्याचा सण आला अन बालपणीच्या पोळ्याच्या गोड साऱ्या आठवणी की ज्या हृदयाच्या गाभाऱ्यात हळुवारपणे जपून ठेवल्या होत्या त्या जाग्या झाल्या अन मी एका क्षणात बालपणात जाऊन पोहचलो. साधारण तीस ते पस्तीस वर्षापूर्वीचा कालखंड..बालपणी आम्ही भावंडे श्रावण महिना आला की पोळ्याची आतुरतेने वाट पाहायचो.आमचा मळा खारी नदीच्या किनारी हिरव्यागार वनराईने नटलेला स्वर्गच होता.शेजारी नदी बाराही महिने वाहत राहायची...ती ही अगदी खुशीत.. अन मळयात पेरूचा बगीचा होता तसेच आंबा, बोरी,बाभळी,लिंब असे विविध प्रकारचे झाडे मोठ्या दिमाखात उभे होते.आज तो मळा धरणात गेला आहे कायमचा. तिथं मळयाच्या पडीतातून चिखल घेऊन मातीचे बैलं बनवयाची सुरुवात आमच्याकडून आठ ते दहा दिवस आधी झालेली असायची अन पोळा येइपर्यंत बैलं गेरूने रंगवून ठेवलेले असत. पोळ्याच्या आदल्या दिवशी खांदे मळणी असल्यामुळे बैलांच्या खांद्यावर जु ठेवत नसू.सकाळी लवकर उठून बैलांची शिंगे विळयाने साळुन घेत असू तसेच शेपटीचे वाढलेले केस ही कापून घेतले की दिवसभर मळ्याच्या पडितात बैलं मनसोक्तपणे पोट भरेपर्यंत चारायचे व दुपारी त्यांना अंघोळ घालण्यासाठी लगेच खाली नदीत वाहत्या पाण्यात घेऊन जायचो..नदीतून छोटे छोटे दगड घेऊन की त्यांना आम्ही वजरी म्हणायचो तिने बैलांना चांगले घासायचे.त्यांच्या अंगावरील गोचीड काढून टाकायचे व कपडे धुण्याची सोना नावाची प्रसिद्ध साबण होती तिने बैलांना चांगल्या प्रकारे अंघोळ घालीत असू कारण गरिबीच्या परिस्थितीमुळे अंगाची साबण माहीतच नव्हती. संध्याकाळी खळयात आलो की तेल हळद व मीठ एकत्र कालवून खांद्याला चोळायचो व त्याला खांदेमळणी म्हणायचो व त्या नंतर आईने मळ्यातून कापून आणलेल्या गवताची वैरण खाण्यास देत असू. दुसऱ्या दिवशी पोळ्याच्या सण असल्यामुळे आम्ही भावंडे सकाळी लवकर उठून बैलांना पुन्हा मळयात चारण्यासाठी व आंघोळीसाठी आनंदाने घेऊन जायचो व दुपारच्या नंतर पुन्हा खळयात येऊन त्यांच्या शिंगाला हेंगुळ लावणे,शिंगाला फुगे व गोंडे लावणे,पाठीवर झुल टाकणे,अंगावर विविध रंगाच्या रांगोळ्या काढणे,ठिपक्याच्या नक्षी काढणे.नव्या मोहरक्या, माटूक्या,वेसनी, कासरा, बाशिंग व जुन्या घागरमाळा की त्यांना लोणच्याच्या जुन्या खाराने घासून घेतले की त्या चकचकीत नव्या होऊन जायच्या त्या बांधायचो व आमचे बैलं अगदी नवरदेवापेक्षाही जास्त सजायचे. पोळ्याच्या दिवशी कोणी कोणता बैल धरायचा हे ठरलेलं असायचं.मी घरी एक छोटासा गोऱ्हा होता तो माझ्याकडे असायचा. संध्याकाळी गावातील सारे लोकं आपापले बैलं घेऊन गावाच्या बाहेर गवळीबाबाचे मंदिर होते तिथं बैलांना परंपरेप्रमाणे दर्शनासाठी घेऊन जायचे सोबत नारळ फोडायचे अगरबत्ती लावायचे कारण की गवळीबाबाचे दर्शन घेतले की बैलांना कोणत्याही प्रकारचा आजार होत नाही अशी गावकऱ्यांची श्रद्धा होती.त्यांनतर बैलांना घेऊन मारूती,महादेव,लक्ष्मीआई,भवानीआई, खंडोबाचे दर्शन गावकरी घ्यायचे व बैलांना घेऊन वेशीसमोर उभे राहायचे.वेशीवर भली मोठे आंब्याच्या पानांचे तोरण बांधलेलं असायचं. गावातील सर्वांची बैलं आली की गावातील पोलीस पाटील,सरपंच व शहाणी माणसं मांग बाबाला डफ वाजवण्याच्या इशारा करायचे व एकदा डफ वाजला की पोळा फुटायचा.. एकदा तर गावातील वेशीतून बैल पहिला कोणी न्यायचा या वरून दारूच्या नशेत दोन गटात मारामाऱ्या झाल्या.दोन्ही बाजूकडील लोकांनी एकमेकांची डोकी फोडली व पोलीस ठाण्यात एकमेकांच्या विरोधात तक्रार दाखल केल्यापासून त्या नंतर प्रत्येक पोळ्याच्या दिवशी दोन पोलीस गावात पोळा फुटेपर्यंत थांबत असे. पोळा फुटला की आम्ही बैलं घेऊन घरी यायचो.आईने अंगणात सडारांगोळी करून खाटेवर नवी सतरंजी अंथरूण तिच्यावर गेरूने रंगवलेले जु व गहू अन पुरणपोळीव मातीचे बैलं ठेवलेलेअसायचे.बैल तिथे आली की आई त्यांची पूजा करायची.त्यांना हाताने पुरणपोळी खाऊ घालायची कधी कधी एखादा बैल पुरणपोळी खात नसे तेव्हा त्याने उपवास धरला आहे असे म्हणायची..आईने पूजा केल्यानंतर आम्ही आनंदाने बैलांना घेऊन खळयात जायचो त्यांना पुन्हा हिरवेगार गवताची वैरण खाण्यासाठी दयायचो व घरी येऊन पुरणपोळीवर ताव मारायचो....अन अशा रीतीने पोळ्याचा दिवस आनंदात कधी जायचा हे कळत ही नव्हते.

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
मो..९४०३३८४८८९

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १८ ऑगस्ट २०२५


## श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल, वेरूळ येथे माजी विद्यार्थी मेळावा संपन्न




**खुलताबाद : (प्रा. योगेश रावते) :** वेरूळ येथील श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल येथे शनिवारी माजी विद्यार्थी आयोजित मेळाव्याला राज्यभरातून अनेक विद्यार्थ्यांनी हजेरी लावली या मेळाव्यासाठी जिल्ह्यातील व स्थानिक विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला होता. 2006 च्या इयत्ता दहावी पास विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रम प्रसंगी प्रथमत: विद्यार्थ्यांच्या वतीने जगद्गुरु जनार्दन स्वामींच्या प्रतिमेचे पूजन करून गुरुजनांचे पूजन करण्यात आले तसेच आलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांचेही विद्यालयाच्या वतीने पुष्प देऊन स्वागत करण्यात आले याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून आपल्या यशस्वी जीवनात विद्यालयाचा, गुरुजींचा व परमपूज्य बाबाजींचा वाटा किती मोलाचा आहे हे कथन करत आम्ही सर्व विद्यार्थी निर्व्यसनी आहोत हेही सांगायला विसरले नाही तसेच गुरुकुल मध्ये शिकत असताना जुन्या आठवणींना उजाळा दिला. अनेकांनी आठवणी सांगताना आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली तर अनेकांना आपले अश्रू अनावर झाले. हे जगद्गुरु जनार्दन स्वामींनी सुरू केलेले गुरुकुल पुढे चालविणारे त्यांचे उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी बाबांचे आम्ही ऋणी आहोत आणि कायम राहणार अशा भावना व्यक्त केल्या कारण हे गुरुकुल खऱ्या अर्थाने तळागाळातील जनसामान्यांपर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचविणारे गुरुकुल आहे या गुरूगुलात येणारे बरेच विद्यार्थी शेतकऱ्यांची, गोरगरिबांची, मजुरांची, अनाथांची मुले असतात आणि या सर्वांना आपल्या मायेच्या पंखाखाली घेऊन परमपूज्य शांतिगिरीजी महाराज त्यांना आईप्रमाणे सांभाळतात इथे आल्यानंतर आम्हाला घरची आठवण सुद्धा येत नव्हती.या गुरुकुलात आलो नसतो तर कदाचित आमच्या जीवनाला योग्य दिशा मिळाली नसती तर आज आमची दशा काही वेगळीच असती अशाही भावना व्यक्त केल्या. आम्ही इथून जाताना शिक्षणाबरोबरच संस्कार सुद्धा घेऊन गेलो आणि म्हणूनच आज कृतज्ञतेच्या भावनेने पुन्हा आपलंही काहीतरी या गुरुकुलाच्या प्रती कर्तव्य आहे या भावनेने या ठिकाणी आलो आहोत जसी आम्हाला त्यावेळी गरज असताना जी मदत, गुरुजींची शिकवण आणि बाबाजींचा आशीर्वाद मिळाला आता यापुढे आम्हीही या गुरुकुलात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फुल ना फुलाची पाकळी म्हणून मदत करण्याचा मानस व्यक्त केला. आम्ही प्रत्येक जण दरवर्षी किमान दोन विद्यार्थी या गुरुकुलात शिक्षणासाठी दाखल करू अशी ग्वाही दिली. गुरुजींनीही विद्यार्थ्यांना जीवनात अजून उंच भरारी घ्या. 'यशस्वी भव:'... असा आशीर्वाद दिला या बॅचचे अनेक माजी विद्यार्थी विविध पदावर कार्यरत आहेत,देशाची सेवा करत आहेत तर काही विद्यार्थी सामाजिक, शेतकीय ,राजकीय, शैक्षणिक,व्यापारी, क्षेत्रात कार्यरत आहेत.या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ शिक्षक, मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री ज्ञानेश्वर क्षीरसागर सर प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक श्री भागिनाथ अधाने तसेच श्री राजेंद्र देव प्रा. नागेश गुळवे प्रा. योगेश रावते प्रा.सुनील कोटकर आदींसह विद्यालयातील सर्व गुरुजी उपस्थित होते.

## 'शिक्षक समितीचे' जिल्हा परिषदेसमोर १८ ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन

**खुलताबाद (प्रा. योगेश रावते) :** जिल्हा परिषद शिक्षकांच्या अनेक प्रलंबित प्रश्नांसंदर्भात व सध्या होत असलेल्या बदल्यांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी व्हावी, या विषयांकडे जि. प. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'शिक्षक समितीने' दि.१८ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याबाबतचे निवेदन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहे.या निवेदनात पात्र शिक्षकांना निवडश्रेणी व चट्टोपाध्याय श्रेणीचा लाभ द्यावा ,प्रत्येक शिक्षकास त्यांच्या कार्यरत शाळेच्या ठिकाणी निवासस्थाने उपलब्ध करून द्यावी तोपर्यंत मुख्यालयी राहण्याची सक्ती करण्यात येऊ नये , बदल्यांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, संवर्ग ३ च्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये झालेल्या गोंधळामुळे बदली प्रक्रियेत अनियमितता झालेली आहे, ती दूर करून दोषींवर कार्यवाही करावी, जिल्हाभरातील पदवीधर शिक्षकांच्या विषय वाटपात मोठ्या प्रमाणात झालेली अनियमितता दूर करून दोषींवर कारवाई करावी, शिक्षण विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षक यांची पदोन्नती प्रक्रिया तात्काळ राबवावी, प्रलंबित शालेय पोषण आहार मानधन तात्काळ वितरीत करावे, थकीत शिक्षकांची देयके व वैद्यकीय बिले तात्काळ निकाली काढावी, सेवापुस्तिका पडताळणी तात्काळ करण्याविषयी प्रत्येक गटशिक्षणाधिकारी कार्यालयास आदेशित करावे, यासह विविध प्रलंबित विषय तात्काळ निकाली काढावे अशी मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनास सर्व शिक्षकांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिक्षक समितीचे जिल्हा अध्यक्ष श्री.विजयसाळकर, जिल्हा सरचिटणीस रंजित राठोड, शामभाऊ राजपुत, आदीसह सर्व पदाधिकारी,सदस्य शिक्षकांनी केले आहे.

## महिला महाविद्यालयात अँटी रॅगिंग प्रतिबंधक दिन उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर : डॉ (सौ.) इं. भा. पा महिला कला महाविद्यालयात आभासी माध्यमाद्वारे उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच राष्ट्रीय अनुदान आयोग व डॉ. बा. आं. म. विद्यापीठाच्या निर्देशानुसार अंतर्गत तक्रार निवारण समिती व रॅगिंग प्रतिबंधक समिती तर्फे अँटी रॅगिंग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई मॅडम होत्या तर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी श्रीमती विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्य डॉ. स्मिताताई देशमुख, अँटी रॅगिंग समिती प्रमुख डॉ महानंदा दळवी आदींची उपस्थिती होती. डॉ.स्मिता देशमुख मॅडम बोलताना सांगितले की, महाविद्यालयात सांस्कृतिक व क्रीडा विषयक अशा विविध स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंग सारख्या समस्येला कशी सुरुवात होते आणि म्हणून त्यासाठी काही नियमावली व कायद्यांच्या चौकटींची त्यांनी तपशीलवार माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई मॅडम यांनी या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. प्रास्ताविक अँटी रॅगिंग समिती प्रमुख डॉ. महानंदा दळवी यांनी केले तर अँटी रॅगिंग समिती सदस्या श्रीमती जोत्सना जावळे यांनी आभार व्यक्त केले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १८ ऑगस्ट २०२५


## महानगरपालिका शाळेच्या विद्यार्थीची आयुक्त साहेबांच्या बंगल्यावर खेळ व आनंददायी शनिवार साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेतील विद्यार्थ्यांनी आयुक्त साहेबांच्या बंगल्यावर जाऊन मी आयुक्त होणार या संकल्पने अंतर्गत स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल या उपक्रमा अंतर्गत आनंददायी शनिवार या शासनाच्या उपक्रमानुसार माननीय आयुक्त साहेब महानगरपालिका छत्रपती संभाजी नगर यांच्या बंगल्यावर जाऊन बॅडमिंटन, क्रिकेट फुटबॉल तसेच लेझीम खेळण्याचा मनसोक्त आनंद घेतला व भविष्यात मीही अधिकारी होईल मी ही आयुक्त होईल अशा प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केले विद्यार्थ्यांसोबत महानगरपालिका छत्रपती संभाजी नगर शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे, कार्यक्रम समन्वयक ज्ञानेश्वर सांगळे शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे तसेच शिक्षक जाहेद खान पठाण व श्रीमती मनीषा शिंदे उपस्थित होत्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या आनंददायी शनिवार या शासन निर्णयानुसार आयुक्त साहेबांच्या बंगल्यावर मनसोक्त आनंद घेतला. माननीय आयुक्त साहेबाकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले त्यावर माननीय आयुक्त साहेबांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा दिलेल्या आहे ही संधी उपलब्ध केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी माननीय आयुक्त साहेबांचे आभार मानले

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात बँकिंग आणि फायनान्स क्षेत्रातील भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

**उमरगा :** उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने बँकिंग आणि फायनान्स क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा मंगळवार दिनांक १९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.धाराशिव जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी हा रोजगार मेळावा मोठी संधी ठरणार असून, २२८ रिक्त पदांसाठी निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या मेळाव्यात एचडीएफसी बँक, ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, यस बँक यांसारख्या नामांकित बँका आणि वित्तीय संस्था सहभागी होणार आहेत. कोणत्याही शाखेचा पदवीधर उमेदवार या मेळाव्यासाठी पात्र ठरणार असून, वयोमर्यादा २६ वर्षांपेक्षा कमी अशी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे नुकतेच शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना व बँकिंग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांना ही सुवर्णसंधी मिळणार आहे. महाविद्यालयात थेट मुलाखतींद्वारे उमेदवारांची निवड केली जाणार आहे. त्यामुळे उमेदवारांना थेट बँक अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची व आपल्या गुणवत्तेच्या जोरावर नोकरी मिळवण्याची संधी मिळणार आहे. जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींसाठी हा रोजगार मेळावा खऱ्या अर्थाने "करिअरची नवी दारे" उघडणारा ठरणार आहे. त्यामुळे पात्र उमेदवारांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. सूर्यकांत रेवते यांनी केले आहे.

## महसूल मंत्र्यांच्या नावाने फसवणूक



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने फोन करून एका शेतकऱ्याची फसवणूक करण्याचा प्रकार छत्रपती संभाजीनगरमध्ये उघडकीस आला आहे. एका अज्ञात व्यक्तीने स्वतःला बावनकुळे साहेबांचे पर्सनल असिस्टंट असल्याचे भासवत शेतकऱ्याला फोन केला आणि त्याचे काम मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर संबंधित व्यक्तीने स्कॅनर पाठवून पैसे पाठवण्याची मागणी केली होती.

शेतकऱ्याला संशय आल्यावर त्याने तात्काळ छत्रपती संभाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस सायबर फसवणुकीच्या या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहेत.

जगन्नाथ जयाजी शेळके असे फसवणूक झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून, त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अधिकृत फेसबुक पेजवर आपली अडचण मांडली होती. त्यांनी पोस्टद्वारे सांगितले की, आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी रस्ता अडवून त्यांच्या वडिलोपार्जित शेतीवर अतिक्रमण केल्यामुळे लागवड करणे शक्य होत नाही. ही बाब शेअर केल्यानंतर काही वेळातच एका अज्ञात व्यक्तीने फोन करून स्वतःला बावनकुळे साहेबांचा पी.ए. असल्याचे भासवले आणि शेतकऱ्याच्या समस्येवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

या व्यक्तीने रस्त्याची मोजणी करण्यासाठी माणसे पाठवतो असे सांगत, पोलीस बंदोबस्तासाठी पैसे भरण्याची मागणी केली. यासाठी त्याने क्यूआर कोड पाठवत पैसे पाठवण्यास सांगितले. या फोनवर दोघांमध्ये संवादही झाला असून, शेतकऱ्याने त्या संभाषणाचा रेकॉर्ड पोलिसांकडे सादर केला आहे. यावरून छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

पीडित शेतकरी जगन्नाथ जयाजी शेळके यांच्याकडून अज्ञात व्यक्तीने अशाप्रकारे दोन वेळा पैशांची मागणी केली. सुरुवातीला आपले काम मार्गी लागेल, या आशेने शेतकऱ्याने 3 हजार रुपये पाठवले देखील. मात्र, त्यानंतरही पुन्हा पैशांची मागणी सुरू राहिल्याने त्यांना फसवणुकीचा संशय आला. त्यामुळे शेवटी त्यांनी छत्रपती संभाजीनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

या प्रकरणात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाचा वापर करून शेतकऱ्याची फसवणूक करणारा हा अज्ञात व्यक्ती नेमका कोण आहे, याचा शोध घेणे पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरणार आहे. सद्यस्थितीत पोलिसांनी शेतकरी आणि आरोपी यांच्यातील कॉल रेकॉर्डिंगच्या आधारे पुढील तपास सुरू केला असून, फसवणुकीचा हा प्रकार गंभीरतेने घेतला जात आहे.


